# कार्यारंभ

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे मराठवाड्यातून, राजस्थानहून आलेली स्थलांतरीत कुटूंबातील मुलं, कधीकाळी भीक मागायची, चोऱ्या करायची, कचरा गोळा करायची, व्यसनाची मजा अन् (लैंगिक) शोषणाची सजा निमूटपणानं सहन करणाऱ्या अशा मुलांसाठी काहीतरी केलं पाहिजे, या विचारातून २० सप्टेंबर २००७ ला भटक्यांची शाळा ही अनौपचारिक शाळा सुरु केली. पालांमध्ये दररोजच्या प्रश्नांसाठी मरणारी माणसं आम्ही पाहत होतो. म्हणून तिथं केवळ शिक्षणच नाही तर मुलींचे आरोग्याचे प्रश्न, महिलांचे बाळंतपण, आरोग्य शिबीरं, रेशनकार्ड, आधार कार्ड, वयाचे दाखले अशा अनेक प्रश्नांवर चौफेर काम सुरु केलं. हळुहळु या कामाला अनेक मदतीचे हात सहकार्यासाठी पुढे येऊ लागले. शैक्षणिक साहित्यांसह अनेक प्रकारच्या मदतींचा ओघ वस्तीत वाढला. तसेच अनौपचारिक शाळेतली मुलं अक्षरं गिरवू लागली. मात्र कुटुंबाचं अन्यत्र स्थलांतर झालं की पुन्हा काम शुन्य व्हायचं; नेमकी हीच बाब अस्वस्थ करून जायची. आपण खरचं शाश्वत बदलासाठी काम करतोय का..(?) हा प्रश्न सतत मनाला चटका लावून जायचा. कधी कधी वाटायचं या अनौपचारीक शाळेला पूर्णविराम द्यावा आणि मुलांना पालांतून-वस्तीतून बाहेर काढून गुणात्मक शिक्षण देण्यासाठी शाश्वत मार्ग शोधावेत; यासाठी मनात खलबत सुरु झाली अन् एक पर्याय समोर आला तो निवासी शाळेचा. तेव्हा सन २०१४ ला शासनाकडे शाळेचा प्रस्ताव सादर केला व १५ जून २०१५ ला खांडवीत निवासी शाळा सुरु झाली. परंतु वर्षभरातच स्थलांतरीत घटकांवर काम करणाऱ्या संस्थेला दुप्पट भाडेवाढीमुळे स्थलांतरीत होण्याची वेळ आली. मग पुन्हा अस्वस्थता पसरली अन् मनाशी खुणगाठ बांधली ठोस पर्याय शोधण्याची आणि खुप विचारांती निर्णय घेतला की, कुटूंबातील सर्व पैसा संस्थेसाठीच्या जागेसाठी गुंतवायचा. कोरफळे गावाच्या माळरानावर ३ एकर जागा घेतली. मग नव्याने शाळेची मान्यता व इतर प्रशासकीय मान्यतेसाठी नव्याने प्रयत्न सुरू केले. अखेर २५ मे २०१७ ला कोरफळे गावात स्नेहग्राम प्रकल्प साकारण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु झाली.

## संस्थेचा लक्ष्यगट

- **स्थलांतरीत व सिग्नलवर भीक मागणारी शालाबाह्य मुले.**
- **अनाथ, निराधार, निराश्रित, वंचित, संघर्षग्रस्त व उपेक्षित मुले.**
- **तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांची मुले.**
- **लैंगिक शोषणाला बळी पडलेली मुले.**
- **दुर्लक्षित जाती जमातींची, एक पालक असणारी मुले.**

## स्नेहग्राम विषयी..!

केवळ मानवी शरीर असुन काय उपयोग..(?) प्रत्येकाला माणसाचे जगणेही जगता यायला हवे, असा संदेश अंध:कारात खितपत पडलेल्या वंचित व दूर्लक्षित भटक्या समाजातील लोकांना देत महेश निंबाळकर यांनी सोलापूर जिल्ह्यातील कोरफळे येथे स्नेहग्राम विद्यालय ही निवासी शाळा सुरु केली. पालातल्या शाळेचा प्रवास निवासी शाळेपर्यंत येऊन पोहोचला. जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सेवेत असलेल्या महेश व विनया निंबाळकर या दाम्पंत्याने वंचित उपेक्षित घटकातील मुलांचे भविष्य घडवण्यासाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्नेहग्रामच्या उभारणीसाठी पुर्णवेळ कार्यकर्ते म्हणून सुरुवात केली. स्नेहग्राम उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रामाणिक धडपडीची दखल आनंदवनचे विश्वस्त तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. विकासभाऊ आमटे व आनंदवन समाजभान अभियानाचे प्रमुख श्री. कौस्तुभदादा आमटे यांनी घेतली. प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेले संसाधने देण्याचा निर्णय झाला. २५ मे, २०१७ ला प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. त्यात शाळेसाठी ५ टीनशेड, ॲम्बुलन्स, एक महिन्याचा किराणा, १५ किलो वॅटचा जनरेटर, भांडी, गणवेश व चादरी अशी भरघोस मदत केली. **डॉ. विकास आमटे, श्री. कौस्तुभ आमटे, श्री. किर्ती ओसवाल, मा.श्री. रमेश घोलप साहेब** (IAS), **मा.श्री. ओमप्रकाश शेटे साहेब** (मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षप्रमुख) यांच्या विशेष सहकार्यामुळे उजाड माळरानावर अन् निर्जन बेटावर स्नेहग्राम साकारले. स्नेहग्राममध्ये वेगवेगळी कौटुंबिक पार्श्वभूमी असलेली ४२ मुले प्रवेशित आहेत. शासनाचे कुठलेही अनुदान मिळत नाही. इथे मुलांना मोफत निवासी शिक्षण देण्यात येते. समाजातील दानशुर लोकांच्या सहकार्यातून हा प्रकल्प चालविण्यात येतो. स्नेहग्राममध्ये विविध प्रयोगातून मुलांमध्ये दडलेल्या क्षमता, ऊर्जांचा, वैशिष्ट्यांचा ठाव घेत त्यांचा ज्ञान-निर्मितीत उपयोग केला जातो.



## स्नेहग्रामच्या प्रयोगभूमीत..!

**केवळ औपचारिक शिक्षणावर भर न देता कौशल्याधिष्टीत शिक्षण व व्यावहारिक जीवनानुभव मुलांना दिले जातात. यात क्षेत्रभेटी, स्नेहग्राम विद्यार्थी बचत बँक, बालसंसद, बालन्यायालय, व्यवस्थापन, गार्यीची काळजी अथवा दुध काढणं, फुड मॅनैजमेंट, स्वच्छता, स्वयंपाक, शेती व कार्यानुभव, पाणवठ्यांचे निर्माणकार्य, गाणी-नृत्य, (फिनलैंड) अध्यापन पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर (व्हर्च्युअल क्लास, व्ही. आर. लायब्ररी, टॅब स्कूल) असे विविधांगी उपक्रम राबवले आहेत. 'आम्हीच आमच्यासाठी' हा विचार मुलांनी प्रत्यक्षात इथे रुजवला आहे. दैनिक कामांपासून ते शिकण्यापर्यंत सर्वच गोष्टी रोटेशनपद्धतीनं चालवल्या जातात.**

## स्नेहग्राम प्रकल्प बांधकाम निधीसाठी आवाहन

अजित फाऊंडेशन, बार्शी या संस्थेच्या वतीने भविष्यात ५०० मुलांचा निवासी प्रकल्प विस्तारण्याचा संकल्प केला आहे. सध्या कोरफळ्यातील ३ एकर माळरानावर तात्पुरत्या स्वरुपाच्या खोल्या असून ५ वर्गांसाठी फक्त २ वर्ग उपलब्ध आहेत. याच २ खोल्यांमध्ये मुलाचं शिकणं नी झोपणं होतं. यासाठी भौतिक सुविधांची

नितांत गरज आहे. तेव्हा देगणीदात्यांनी संस्थेला आपल्या कौटुंबिक आनंददायी प्रसंगी, प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधकामासाठी आर्थिक सहयोगासह, सिमेंट गोण्या, वीट, पत्रे, अँगल, दारे, खिडक्या, टाईल्स, फरश्या, डबर, पाईप, मोटार, लाईट साहित्य, उपयोगी बांधकाम साहित्याची मदत करु शकता. त्या निमित्ताने आपल्या प्रियजनांची स्मृती स्नेहग्रामलामध्ये जपली जाईल. आपण बांधकाम निधी **'अजित फाऊंडेशन'** या नावे खालील बँक खातेत जमा करु शकता..!

Union Bank of India - A/c No. 378302010553114
IFSC No. UBIN0537837

## आपली छोटीशी मदत, निर्मिल प्रेरक आयुष्ये..!

अजित फाऊंडेशन, बार्शी ही नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेला व संस्थेच्या स्नेहग्राम प्रकल्पाला शासन सहयोग अथवा कुठलेही अनुदान नाही. तरी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आपल्या सहयोगाची आवश्यकता आहे. आपण आर्थिक, अन्नधान्य, वस्तू, शैक्षणिक साहित्य सहयोगातून संस्थेस मदत करु शकता. -

- १ वेळचे भोजन (पंगत) = २१००/-
- १ दिवसाचे जेवण = ५०००/-
- १ मुलाचे वार्षिक पालकत्व = १४,४००/-
- १ मुलाचे मासिक पालकत्व = १२००/-

आपण दानराशी 'AJIT FOUNDATION' या नावाने धनादेश, डी. डी. अथवा बँक खात्यावर ऑनलाईन जमा करु शकता. कृपया देणगी जमा केल्यानंतर आपले नाव, पत्ता, संपर्क नंबर, ईमेलद्वारे संस्थेला कळवावे. आपण दिलेल्या देणगीची पावती आपणास पाठवली जाईल.

ICICI Bank Ltd.
A/c No. 034101001838
IFSC No. ICIC0000341
MICR Code : 413229052

आपण दिलेली देणगी आयकर अधिनियम १९६१ च्या 80 G नुसार करमुक्त आहे व सदरहु देणगी मानव कल्याणार्थ उपक्रमासाठी वापरली जाते.










सोसायटी नोंदणी क्र. महा/१३१८/२००६
विश्वस्त नोंदणी क्र.एफ-१८१८०(सोलापूर) पॅन नं : ABTC2321B
देगणी करमुक्त असल्याचा परवाना : (Regd. 80-G) PN/CIT-IV/Tech/80g/AF/4/2012-13/180 Date : 11/04/2012

स्नेहग्राम विद्यालय : शिक्षण उपसंचालक (पुणे विभाग पुणे-१)जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६/ शिक्षण उपसंचालक, पुणे-१ यांचे कार्यालय/१७७०८ दि. ८ ऑगस्ट, २०१६. शाळा क्र. १५९०

## संपर्क

| | | | |
|---|---|---|---|
| • पुणे | : किर्ती ओसवाल | -9922923456 |
| | अरविंद केळकर | -9850904276 |
| | श्रीम. शर्मिला ताम्हणकर | -9850968963 |
| • मुंबई | : राजेंद्र कांदळगावकर | -9821322592 |
| • मालाड | : नरेंद्रभाई मेस्त्री | -9322663626 |
| | (आनंदवन मित्र मंडळ, मालाड) | |

सचिन, बार्शी. ९८८१७१९३४३



श्रद्धेय बाबा आमटे यांच्या स्मृतिस वाहिलेले..!

# स्नेहग्राम विद्यालय
## कोरफळे, बार्शी

वंचित उपेक्षितांच्या शैक्षणिक हक्कांसाठी...



संपर्क

## स्नेहग्राम विद्यालय

मु.पो. कोरफळे, पानगांव रोड, ता. बार्शी.
जि. सोलापूर- ४१३४०१ (महाराष्ट्र)
महेश निंबाळकर : 9405024613/9822897382
विनया निंबाळकर : 9096812860/8459680002
srujanonline@gmail.com

सहयोग
आनंदवन
समाजभान अभियान